# तथागत

असशील राणी तू नि तो असेल राजपुत्र
म्हणून का त्याच्यापासून झाकशील तू सत्य ||१||

माऊलीस वाटे खूप लेकरू व्हावे अमर
शक्य ते का दाविता न बाळा कधी मृत जर ||२||

लपविले बाळापासून वृद्ध जराजर्जर
म्हणून हे कसे शक्य बाळ बनेल अजर ||३||

सूर्य ढळे मावळे वैभव वसे न आगत
कळेल का न राजपुत्रा तो तर तथागत ||४||

– नारायण
१०/०१/२३